सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म



रेकी साधक **दिक्षा राऊत** यांची मंडल चित्रकला

वर्ष ९वे अंक २रा । नोव्हेंबर २०२०



संपादकिय

# शेवटी दिवाळी आलीच

२०२०चे वर्ष सुरू झाले आणि न भूतो न भविष्यती अशा घटना घडायला सुरूवात झाली. कोरोना व्हायरस नावाच्या संकटाने तर सगळ्या जगाला सळो कि पळो करून सोडले. आजवर कोठल्याही जागतिक संकटाला जे करता आले नाही ते शेवटी कोरोनाने करून दाखवले. मानवाचा स्वत:वरचा आणि स्वत:च्या तथाकथित पुढारलेपणाच्या अहंकाराचा चक्काचूर करून टाकला. जे कोठलेही महायुध्द मग ते पहिले असो अथवा दुसरे, कोठलेही तूफान किंवा चक्रिवादळ असो, महापूर असो अथवा अगदी भूकंप असो, त्यांनी केले नाही असे सगळे जग एक नाही, दोन नाही तर तब्बल चार पाच महिने बंद करून टाकले. माणसाला आपापल्या घरांत बंद करून टाकले. अगदी अभूत पूर्व अशी स्थिती जी मानवाने दु:स्वप्नात सुद्धा पाहिली नव्हती. जी कोठल्याही पुराणात कोठल्याही प्रलयाच्या वर्णनात नव्हती. सगळी मानवी व्यवस्था कोलमडून टाकली ह्या एका महामारीने. अविकसित आणि विकसित देशांच्या मधल्या रेषा पुसल्या गेल्या. महामारीत मरणाऱ्या अस्वच्छ, घाणीत, झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब माणसांपेक्षा टोलेजंग महालात राहणारे मोठ्या–मोठ्या ऐपतीचे महाभाग पटापट बळी पडत होते. कोणाचाच मुलाहिजा न ठेवता कोरोना मनुष्य जमातीत हैदोस घालत होता एखाद्या पौराणिक कथेतील भयंकर राक्षसासारखा, महिन्यामागून महिने जात होते, सणामागून सण जात होते. उदासिनतेची कळा वाढत होती. माणसाच्या प्रगतिचा उष:काल होता होता एक मोठी काळीकुट्टकाळरात्र समोर ठाकली.

परंतु आता दिवाळीचा समय आला. काळ्या कुट्ट रात्रीच अवतरणाऱ्या ह्या दिव्य मंगल सोहळ्याचा हा क्षण. श्रध्देच्या लाखो पणत्या पेटवूया, आशा अपेक्षांचे झुळझुळते कंदील आपल्या शेपट्या फिरवत अंधाराला भिववू देत. चकल्या–कडबोळ्यांच्या खमंग सुवासात कोरोनाचा दर्प सुप्त होऊ देत, भिरभिरणाऱ्या आणि मोठ्या आवाजाच्या फटाक्यांना घाबरून हा राक्षस आपले शेपूट गुंडाळुन पळून जाऊ दे. माणसांच्या केवळ अंगालाच नव्हे तर मनालाही प्रसन्नतेचे तेल लावून अभ्यंग स्नान घडू दे. दिवाळी म्हणजे आशेचे असंख्य दीप लावणारा आपला लाडका सण. आता सगळ्या आशा दिवाळीवर. वाटले नव्हते दिवाळी पण येईल. पण परमेश्वराची कृपाच अगाध, ह्या नव्या कोरोनरकासुराचा वध आता नरक चतुर्दशीला होईल. नव्या हिशोबांसाठी भ्रष्टतेतून मुक्त झालेल्या हिशेबाच्या नव्या कोऱ्या वह्यांच्या पूजेनंतर नवे आर्थिक वर्ष सुबत्ता घेऊन येईल. घराघरातून शुद्ध, सात्विक महालक्ष्मीच्या पूजा होतील. आणि शेवटी सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योति ओवाळीते भाऊरायाच्या सुरेल तालावर घराघरामध्ये नव्या नात्यांतून नवा माणूस उभा राहील हीच आपली स्वामीचरणी प्रार्थना.

तुम्हा सगळ्यांना ही दिवाळी सुखाची आणि सुरक्षित जावो. श्री स्वामी समर्थांचा आशिर्वाद तुम्हा सर्वांना लाभलेला आहेच.

जय गुरूदेव<br>
**अजित सर**<br>
दि. २६ ऑक्टोबर २०२०.



# हम कथा सुनाते रामसकल गुणधामकी..
# ये रामायण है पुण्यकथा श्रीराम की...

**मृणाल कुटुंबळे, वडोदरा.**

लॉकडाऊनच्या काळामध्ये आपण रामायण पाहिलं. छोटया लवकुशांना, प्रभू श्रीरामांसमोर, रामकथेचे गान करताना पाहून मन भरून आले. असं काय आहे ह्या रामनामात आणि रामकथेत. आता कळतेय की लहान असताना जेव्हा रामायण दुरदर्शन वर प्रसारित होत होते तेव्हा आपल्या आई, आजीच्या डोळ्याच्या कडा का पाणावत होत्या. युगे बदलली तरी रामनामाची आणि रामायणाची ओढ तशीच आहे. ५ ऑगस्ट २०२० हा दिवस खरच ऐतिहासिक होता. ५०० वर्षाच्या स्वप्नांचा मूर्त स्वरूपात श्रीगणेश झाला. तो सुध्दा अशा व्यक्तीच्या हातून, ज्यांच्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच. राममंदिराचे भूमीपूजन स्वत:च्या हातून करणे ह्यासारखे सद्‌भाग्य दुसरे नाही.

राम आणि रामायण हे मानवी मनाला ओढ लावणारेच आहे. असे म्हणतात की रामावतारात कोणाची काय भूमिका असणार आहे हे सुध्दा भगवंतानेच नक्की केले होते. कैकयीला स्वत:च्या भूमिकेचे दु:ख झाले. पण आज्ञा म्हणून तिने तिची भूमिका पार पाडली. मात्र त्यांनतर तिला अतोनात दु:ख झाले. ती खूप रडली. माझ्या वाटयाला ही भूमिका का आली? रामायण काळात जी पात्रे होती ती ह्या काळात पण असावी का? असा एक विचार मनात डोकावून जातो. कारण त्याकाळात जी पात्रे होती त्यातली बरीचशी ह्या काळात सुध्दा पृथ्वीवर वावरत असतीलच की. फक्त रुप आणि भूमिका वेगळी असेल एवढच. अयोध्येच्या राममंदिराच्या पायाभरणीची पूजा बघताना असेच काहीसे विचार डोक्यात धुमाकूळ घालत होते. हा क्षण आता आपल्याला पाहायला मिळतोय त्यामागे गेल्या ५०० वर्षांची तपश्चर्या आहे. अनेकांची बलिदाने, दृश्य अदृश्य स्वरूपात दिलेले योगदान, ह्या सगळ्याचा एकत्रित परिणाम आहे. ज्याप्रमाणे त्या काळात दगडावर रामनाम लिहून प्रभू श्रीरामांच्या सेनेने सागर पार केला, त्याप्रमाणे मागच्या ५०० वर्षाच्या कालावधीत 'जय श्रीराम' ह्या जयघोषाने एक एक अडसर दूर होत आज श्रीरामांच्या भव्य मंदिर बांधकामाचा मार्ग मोकळा झाला.

नकारात्मकतेचा अनुभव झाल्याशिवाय सकारात्मकतेची महत्ता आपल्याला समजत नाही. रामायणात जी नकारात्मक पात्रे होती, ती वेगळ्या रुपात ह्या कलियुगात पण वावरत असणारच, जी राममंदिराच्या निर्माणात अडसर होती. पण शेवटी विजय सत्याचाच झाला. जे रामाचे कार्य करत आहेत त्यांच्या पाठीशी रामनामाची ताकद आहे, ते काम अपूर्ण कसे राहणार?

असे म्हणतात की ज्येष्ठ वकील श्री. के पराशरन यांनी सर्वोच्च न्यायालयात देशाचा संवेदनशील विषय 'रामजन्मभूमी विवाद' हिंदूच्या बाजूने मांडला. त्यांनी फक्त

कायद्यालाच नाही तर हिंदू धर्म, हिंदू तत्वज्ञान, श्रध्दा त्यामागची पार्श्वभूमी, आस्था, तथ्य यांचा सखोल अभ्यास केला. ९२ वर्षाच्या हया चीरतरूणाने न्यायालयात आपली बाजू मांडताना बसायला खुर्ची घेण्यास नकार दिला. संपूर्ण आचारसंहितेचे पालन करुन त्यांनी न्यायालयासमोर मुद्दे मांडले. न्यायालयात प्रभू रामचंद्राविषयी बोलताना आपली पादत्राणे काढून ठेवून मगच ते बोलायचे. 'स्थानमहात्म्याची' संकल्पना त्यांनी धाडसाने आणि विश्वासाने न्यायालयासमोर मांडली. तसेच दुसरे भारतीय, पुरातत्व खात्याच्या वतीने भक्कम पुरावे कुठल्याही दबावाला बळी न पडता कोर्टात सादर करणारे, श्री के के मुहम्मद. अशाच सत्यनिष्ठ लोकांमुळे आज हा दिवस आपण बघत आहोत. राम प्रजेच्या हृदयात वसले आहेत, म्हणून तर कवी असो फिल्मकार असो, आपल्याला कधी गीत रामायणातून तर कधी रामायण मालिकेतून रामाची ओळख करवून देतात.

रामावतारात ज्या पात्रांनी आपली भूमिका पार पाडली त्याप्रमाणेच ह्या काळातल्या राममंदिर बांधकामासाठी विवादाच्या पूर्णाहुती पर्यंत नेताना अनेक लोकांनी स्वत:ची भूमिका यशस्वीरित्या पार पाडली. आपल्या वाटेला आलेली भूमिका समर्थपणे पेलायला शिकवणे, हाच तर त्या प्रभू श्रीरामचंद्राचा, कलियुगात 'राममंदिर स्थापन' करण्याच्या निमित्ताने, जनतेला शिकवलेला धडा असावा. त्रेतायुगात स्वत: प्रभू रामचंद्रांनी सगळ्या भुमिका कशा पार पाडाव्या ह्याचा आदर्श लोकांसमोर ठेवला. मग ती पतीची, पित्याची, मुलाची, राजाची, संन्यासाची, कोणतिही भूमिका असो. श्रीरामाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पिढया मोठया झाल्या. भाबडी प्रजा रामाची भूमिका करणाऱ्या अभिनेत्याला साष्टांग दंडवत करते. रामायण पाहायला दूरदर्शन समोर बसताना शुचिर्भूत होऊन बसते त्यावरून लक्षात येते की प्रभू श्रीराम प्रजेच्या कणाकणात व्याप्त आहेत. प्रभू श्रीरामांप्रमाणे ह्या जन्मात आपल्या वाटयाला आलेली भूमिका आपल्याला समर्थपणे पेलता यावी यासाठी त्यांच्या चरणी वंदन.

रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे ।<br>
सहस्त्रनामतत्तुल्यं रामनाम वरानने ॥

॥ जय श्री राम ॥



# तुझी झाल्यापासून

भाग्यश्री पुरोहीत, नाशिक

मी तुझी झाल्यापासून<br>
कसली चिंताच उरली नाही<br>
तुझ्यापुढे स्वामी माझी<br>
सावलीही उरली नाही ॥

किती शिकवलेस धडे<br>
किती घेतल्यास परिक्षा<br>
जिथे तिथे उभा होतास<br>
दाखवायला दिशा ॥

माझ्या आयुष्याचं जहाज<br>
वादळास सोडलंस<br>
आठवणीने शिडात माझ्या<br>
प्रेम भरून दिलंस ॥

जेव्हा वादळी लाटांवर<br>
तोल सावरेनासा झाला<br>
तुझा हात तेव्हा स्वामी<br>
आधार द्यायला आला ॥

पुन्हा एकदा डोळ्यात तुझ्या<br>
मी तेच प्रेम पाहीलं...<br>
तुझ्या पायांवर स्वामी तेव्हा<br>
मी माझं जीवन वाहीलं.... ॥

किती आली संकट तरी<br>
आता हरणार नाही<br>
बाळ कधी घाबरतं का<br>
जवळ असता आई...? ॥





(भाग ३६वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

**अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक**

उमाचरणजी स्वामीजींबरोबर पंचगंगा घाटावर आले. स्नान झाल्यावर त्यांनी स्वामीजींचे अंग पुसून दिले. मग दोघेही आश्रमात आले. संध्याकाळी वही घेऊन उमाचरणजी स्वामीजींबरोबर एका छोटया खोलीत गेले. तेथे बसल्यावर स्वामीजी म्हणाले, "आजपासून रोज एकूण बारा विषयांवर तुला उपदेश करीन. ते सर्व लिहून घे. विषय आहेत – सृष्टी, देव, संसार, गुरु–शिष्य, चित्तशुध्दी, धर्म, उपासना, पुनर्जन्म, आत्मज्ञान, तन्मयता, तत्वज्ञान व काही महत्वपूर्ण गोष्टी."

नंतर स्वामीजी बोलत होते व उमाचरणजी लिहित होते. तेराव्या दिवशी हे कार्य पूर्ण झाले.

उमाचरणजींचे सतत येणे, स्वामीजींबरोबर राहणे व त्यांची सेवा करणे, हे पाहून अनेकांना वाटले की स्वामीजी त्यांना शिष्य करून घेतील. सर्वप्रथम मंगलदासांनी उमाचरणजींना विचारले, "आपण बाबांना वश करून घेतले आहे. कदाचित ते तुम्हाला शिष्य करून घेतील."

उमाचरणजींना कुतुहल वाटले, ते म्हणाले, "स्वामीजी असे म्हणाले का?" मंगलदास म्हणाले, "म्हणायचे काय त्यात. आपल्याइतके आत्तापर्यंत कोणीच स्वामीजींचे लाडके नव्हते. बाबा नेहमी म्हणतात की हा बंगालीबाबू खूप शांत व सुस्वभावी आहे.

स्वामीजींचे आपल्याबद्दलचे मत ऐकून उमाचरणजींना खूप आंनद झाला. ते मंगलदासांना म्हणाले, "स्वामीजींनी मला दिक्षा द्यावी असा तुम्ही त्यांना अनुरोध करा ना."

मंगलदासांनी होकार दिला. दुसऱ्या दिवशी स्वामीजींजवळ बसून उमाचरणजी मनातल्या मनात योग–शिक्षणाकरिता शिष्य बनण्याची कल्पना करीत होते. ते असा विचार करत असतानाच स्वामीजींनी मंगलदासांना बोलाविले व म्हणाले, "हा बंगाली बाबू माझ्याकडे दिक्षा मागतो आहे."

उमाचरणजी म्हणाले, "आपण माझ्यावर एवढी कृपा केलीच आहे तर माझा उध्दार करून द्या, स्वामीजी !"

स्वामीजी म्हणाले, "कठीण समस्या आहे. सध्या तू आकाशात उडणारा स्वच्छंद पक्षी आहेस. दिक्षा घेतली की बंधनात अडकशील. आत्ता जा. रात्री ये मग बोलू."

संध्याकाळी आल्यावर स्वामीजी त्यांना एका छोटया खोलीत घेऊन गेले. तेथे बसल्यावर ते म्हणाले, "तू माझ्याकडून योग शिक्षण घेण्याचा विचार करतो आहेस. पण योग–शिक्षण घेण्याचा तुला अधिकार नाही. त्यापेक्षा उपासना मार्गाने वाटचाल कर. या माघ महिन्याच्या तृतीयेला, पुष्य नक्षत्रावर चंद्रग्रहण आहे. तोपर्यंत तुला थांबावे लागेल, कारण देहशुध्दी शिवाय दिक्षा देता येणार नाही. या चंद्रग्रहणाच्या दिवशी तुझा देह शुध्द करून देईन."

मग काही सामानाची यादी लिहायला लावून सांगितले की, "गंगास्नान झाल्यावर एका आसनावर बसून जप करावा लागेल."

यानंतर एक मंत्र लिहायला लावला व सांगितले की जप संपल्यावर सर्व सामान एका सत्पात्री ब्राम्हणाला दान कर, पण उमाचरणजींना माहित होते की ग्रहणकाली कुठलाही सत्पात्री ब्राम्हण दान घेत नाही. उमाचरणजींनी तसे विचारताच स्वामीजी स्मित करून म्हणाले, "यातील सामानाचे नाव घेऊन जो ब्राम्हण तुला दान मागेल त्याला देऊन टाक. अशाने तुझे काम सिध्दीस जाईल."

उमाचरणजींचे शंका निरसन झाले, ते माघी तृतीयेची वाट पाहू लागले. ग्रहणाच्या दिवशी स्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे सर्वकाही झाल्यावर, उमाचरणजी आसनावरून उठताच एक ब्राम्हण आला व त्यांच्याजवळच्या सामानाचे नाव घेऊन दान मागू लागला. सर्व सामान घेऊन तो गर्दीत गायब झाला. दुसऱ्या दिवशी स्वामीजींकडे जाऊन उमाचरणजी म्हणाले, "बाबा आपल्या आज्ञेनुसार सारे कार्य सिध्दीस गेले.

"आता तुझे शरीर पण शुध्द झाले. तुला दिक्षा देईन."

क्रमश:



# शुभ्रक घोडा

## भारतिय इतिहासातले सोनेरी पान

(जे परकियांनी पुसून टाकले)

**अजित सर**

इतिहास हा जेत्यांचा खुशमस्कऱ्या आणि पराभूतांचा निंदक असतो असे एक सुंदर वाक्य महाकवि कुसुमग्रजांच्या एका लेखात आहे. सर्वच इतिहासाच्या बाबतीत हे सत्य असले तरीही भारतिय इतिहासाच्या बाबतीत तर ह्या बाबतीत परकिय इतिहासकारांनी तर कळसच केला आहे. आता आता "त्या" इतिहासाचे भ्रष्ट स्वरूप जनतेच्या समोर येते आहे हे आपले नशीब.

कुतुबुद्दीन ऐबक नावाचा एक क्रूर मुगल सरदार असाच भारतावर इ.स. १२००च्या सुमारास राज्य करून गेला. तो लाहोर येथे घोडयावर इ.स. १२१० साली पडून मेला एवढाच उल्लेख इतिहासाने करून त्याच्या कारकीर्दीचा समारोप केला. त्याच्या मृत्युमागची कथा ही भारतिय इतिहासातील एक सोनेरी पान आहे हे खालील कथा वाचल्यानंतर लक्षात येईल.

ही कथा आहे "शुभ्रक" नावाच्या एका अबलख घोडयाची. शिवाजी महाराजांचा "कृष्णा" घोडा किंवा राणा प्रतापांचा "चेतक" घोडा हे तर आपल्या बहादुरीने इतिहासात अमर झाले. दुर्दैवाने इतिहासकारांच्या दुष्टबुद्धीने शुभ्रकचे शौर्य आणि इतिहासातील त्याचे महत्व लुप्तच राहीले.

चितोडचा राजा समर सिंह देव हा पृथ्वीराज चौहान आणि महंमद घोरीच्या ११९१–९२च्या लढाईत मारला गेला. समर सिंह हा बाप्पा रावलच्या वंशातला. त्याच्या पहिल्या पत्नी प्रिथाबाईपासून त्याला झालेला मुलगा म्हणजे कल्याण राय. त्यानंतर त्याने दुसरे लग्न केले ते गुजरातच्या शूर–वीर राणी नायकीदेवीच्या मुलीशी म्हणजे कुरमादेवीशी. त्यांचा मुलगा म्हणजे करण सिंह. महंमद घोरीविरूद्धच्या लढाईत



समरसिंहाबरोबर त्याचा पुत्र कल्याण रायही मारला गेला. हा दुहेरी आघात सहन न होऊन प्रिथाबाईंनी त्या काळच्या प्रथेनुसार सती जाणे पत्करले. नायकीदेवीने मात्र आपल्या व्याह्याच्या वधाचा सूड म्हणून प्रत्यक्ष महंमद घोरीलाच ठार करून एक नवा इतिहास रचला. तिच्या मुलीने म्हणजे कुरमादेवीने मात्र प्रिथाबाईबरोबर चितेत प्रवेश न करून आपले कर्तव्य म्हणजे करण सिंहाला राज्यपदावर बसवणे व ज्या सरदाराने म्हणजे कुतुबुद्दीन ऐबकने तिच्या पतीचा वध केला त्याला मारणे, पूर्ण करून मग चितेत उतरणे ठरवले. आणि झालेही तसेच.

तिने करण सिंहाला राज्यपद तर दिलेच, पण सरळ दिल्लीवर चढाई करून भारताचा पहिला सल्तनत घोषित केलेल्या कुतुबुद्दीनवर चढाई करून त्याला धारातीर्थी पाडले. तिने मग आपल्या देहाचा त्याग केला. परंतु कुतुबुद्दीन मेल्याची वार्ता खोटी ठरली. तो घायाळ झाला होता खरा पण त्या जीवघेण्या हल्ल्यातून तो वाचला हे कुरमादेवीला कधीच कळले नाही.

ह्या घटनेचा बदला म्हणून मग कुतुबुद्दीनने चितोडगढवर हल्ला करून विनाश केला व राजा करण सिंहाला बंदी बनवून लाहोरला नेले. करण सिंहाचा उमदा घोडा शुभ्रकही त्याने पळवला. बंदोबस्तात असताना करण सिंहाने पळायचा अयशस्वी प्रयत्न केला आणि तो पुन्हा पकडला गेला. यावेळेला सूडापोटी कुतुबुद्दीनने त्याचा शिरच्छेद करून त्याचे मुंडके चेंडू म्हणून वापरून घोडयावरचा खेळ करायचा बेत केला. ह्या कार्यक्रमासाठी तो शुभ्रक घोडयावरून रूबाबात मैदानात पोहोचला व त्याने करण सिंहाला शिरच्छेदासाठी मोकळे केले. आपल्या मालकाला अश्या अवस्थेत पाहून शुभ्रक उत्तेजित झाला व त्याने कुतुबुद्दीनला आपल्या पाठीवरून फेकून दिले. त्याच्यावर आपल्या सामर्थ्यवान पायांचा वापर करून १५–१६ लत्ताप्रहार करून त्याने भारताच्या त्या सुलतानाला ठार मारले व तो त्वरित करण सिंहासमोर येऊन उभा ठाकला. झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन करण सिंह आपल्या लाडक्या घोडयावरून निसटला तो थेट आपल्या चित्तोडच्या किल्ल्यात. शुभ्रक कित्येक दिवस धावत होता. आपल्या राज्यात पोहोचल्यानंतर करण सिंहाने शुभ्रक वरून पायौतार होऊन त्याच्या पाठीवर हात ठेवला मात्र, शुभ्रकने आपल्या देह सोडला. एवढा मोठा पराक्रम करणारा शुभ्रक मात्र इतिहासकारांच्या बखरींमधून कोठेच डोकावला नाही. त्या शुभ्रकला साऱ्या भारतियांनी मुजरा करावा एवढे मात्र खरे.





# भक्त आणि देवाचं नातं

तेजश्री रानडे, देवगड

कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे आज जवळ जवळ चार–पाच महीने सर्व मंदीरं सामान्यांसाठी बंद झाली आहेत. परंतु ही बंद दारं, भक्त आणि देव यांच्यामधील नात्यामध्ये अंतर आणू शकत नाहीत. हेच सांगणारी ही कविता...

गेले दृष्टिआड गेले, त्याचे मुख ते साजिरे
भक्त दुरुनच पाहे, बंद मंदिराची दारे ॥१॥

कोण आला आगंतूक, ठेवी पाठीवर हात
निराश होऊ नको, मोठया मायेने बोलत ॥२॥

बाळा फुकाची रडतो, का विसरून गेला?
देव मंदिरात नाही, तूझ्या आत विसावला ॥३॥

शोध खोल आतमध्ये, घे लोचने मिटूनी
गवसेल ठाव त्याचा, जो विश्वाचा या स्वामी ॥४॥

कोण कुठला आगंतुक, हे काय म्हणतो आहे
देव मंदिरात नाही, म्हणे अंतरात आहे ॥५॥

परि त्याच्या वाणीवर, पाहे विश्वास ठेऊन
बसे शोध घ्यावयाला, घटट लोचने मिटून ॥६॥

आगंतूक म्हणे त्याला, घाल साद माऊलीला
वाहू दे अस्तित्वात, प्रेम अमृताचा झरा ॥७॥

शब्द कानात घुमले, मन रोमांचित झाले
भाव आर्ततेने आज, आत दाटूनिया आले ॥८॥

साद भक्ताची ऐकून, देव हृदयी प्रगटला
भक्त म्हणे देव आज, बंद डोळ्यांनी पाहिला ॥९॥

भक्त झाला धन्य धन्य , जणू माऊली भेटली
प्रेमरुपी चंद्रभागा, आज डोळ्यांनी वाहिली ॥१०॥

तृप्त झाला दर्शनाने, डोळे उघडून पाहि
काय आश्चर्य जाहले, कोठे आगंतुक नाही ॥११॥

देव त्याच्याच रुपात, आला खुण ती पटली
जेथे उभा होता तेथे, पदचिन्हे उमटली ॥१२॥



खरंच, हीच वेळ आहे आतल्या स्वामीरायांना पाहाण्याची. आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात त्यांची पदचिन्हं कायमची उमटली आहेत आणि ते अनंतकोटी ब्रम्हांडनायक स्वामीराय सदैव आपल्यासोबत आहेत हे जाणून घेण्याची.






# उच्चार, विचार आणि आचार..

भज गोविंदम् ह्या आदि शंकराचार्यांच्या अतिशय मधुर आणि खुप नावाजलेल्या श्लोक संग्रहातील पहिलाच श्लोक “भज गोविंदम, भज गोविंदम, मूढमते, संप्राप्ते सन्निहिते काले न हि न हि रक्षति डुकून्करणे॥” हा त्यांच्या काशीयात्रेत त्यांना भेटलेल्या एका मूढ पंडिताला उद्देशून आहे ज्यात ते त्याला उद्देशून म्हणतात, “हे मूढा, आयुष्याचा शेवट जवळ आला असताना कशाला हे व्याकरणाचे पांडित्य प्रदर्शित करतो आहेस? त्यापेक्षा गोविंदाचे भजन कर, त्याचे पूजन कर, त्याचे ध्यान कर. तेच तुला आता उपयोगी पडेल.” शंकराचार्यांसारख्या प्रकांड पंडिताकडून हा संदेश आलेला आहे हे लक्ष्यात घेतल्यावर कोठेतरी व्याकरण, उच्चार यांना किती महत्व द्यावे याचा विचार करावाच लागेल. कोठल्याही स्तोत्राची, ग्रंथाची, स्तवनाची महति ही त्याचा अभ्यास करणाऱ्या माणसाने आयुष्यात ते किती उतरवले आहे त्याच्यावर ठरत असते नाही तर त्या कृतिचे एक साहित्यिक मूल्य एवढेच महत्व राहील. या निमित्ताने ही एक बोधकथा.

गोष्ट आहे गेल्या शतकातील आणि बंगाल मधील. त्या काळात चैतन्य महाप्रभू हे प्रत्यक्ष भगवान कृष्णाचे अवतार मानले जायचे. ते एकदा शहरामध्ये असाच फेरफटका मारत होते. अचानक त्यांच्या तीक्ष्ण कानांवरती भगवत गीतेचे सूर उमटले. कोठून तरी दूरवरून हे सूर येत होते हे त्यांच्या लक्षात आले. झाले, चैतन्य महाप्रभूंचे पाय त्या गीतेच्या सुरांचा शोध घेत घेत त्या दिशेने वळले. काही वेळानंतर तेच सूर अगदी जवळून येऊ लागल्यावर त्यांच्या लक्षात आले कि आता आपण त्या स्थानाच्या जवळ जातोय. आता हे गायन स्पष्ट ऐकू येऊ लागले होते. चालता चालता ते ऐकताना त्यांच्या लक्षात आले कि गाणाऱ्याचा गळा सुरेल आहे खरा, परंतु त्याचे काही उच्चार खूपच चुकीचे आहेत. व्याकरणातही खूप चुका आहेत. हा माणूस संस्कृत शिकला नसावा आणि गीतेचा फारसा अभ्यास त्याने केला नसावा हे त्यांच्या मनात ठाम बसून गेले. एखाद्या सच्चा गुरूसारखा भाव त्यांना मनात दाटून आला. याला पैलू पाडायला हवेत. गीता व्यवस्थित उच्चारांसकट, व्याकरणासकट शिकवायला हवी.

हे सारे विचार मनात येईपर्यंत ते त्या गाणाऱ्या गृहस्थाच्या घराच्या दारापर्यंत पोहोचले. तो गाणारा तल्लीन होऊन भगवान कृष्णांच्या मोठया मूर्तिसमोर गीता गाण्यात भावविभोर झाला होता. महाप्रभू तेथेच थांबले. त्यांना त्या भक्ताची समाधि भंगू द्यायची नव्हती. त्या गृहस्थाला तर पत्ताच नव्हता कि प्रत्यक्ष महाप्रभू आपल्या दरवाजात उभे राहून आपल्याकडे पाहत आहेत. अशी काही मिनिटे गेल्यावर त्याचे गायन संपले आणि त्याने डोळे उघडले. नजरेसमोर प्रत्यक्ष महाप्रभूंना पाहून तो भारावून गेला आणि त्याने डबडबत्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूधारांचा अभिषेक करत महाप्रभूंचे चरण भिजवून टाकले. महाप्रभूंनी त्याला वरती उठविले. म्हणाले, “शाबास. फार छान गायलास तू. पण त्यात उच्चारांच्या फार चुका होत्या त्या तुला दुरुस्त करायला हव्यात. तुझे व्याकरण आणि मुळात संस्कृतच कच्चे आहे हेही माझ्या लक्षात आले. तेही सुधारायला हवे तरच ह्या गीता गायनाचे सार्थक झाले म्हणायचे.”

तो गृहस्थ पुन्हा महाप्रभूंच्या पायावर कोसळला आणि म्हणाला, “महाप्रभू, क्षमा करा. मी कधीच संस्कृत शिकलो नाही. कधीच व्याकरणाचा अभ्यास केला नाही असे असूनही मी चुकीच्या पद्धतीने गीता गात राहीलो. हे पाप झाले असेल. परंतु मी तरी काय करू? भगवत गीता म्हणायला मला फार आवडते. मी गाताना मला स्वत:चेच भान राहत नाही. मी बेभान होतो. परंतु ही दिव्य गीता गाताना माझा लाडका कृष्ण माझ्यासमोर हसत हसत उभा असतो. तो माझ्यावर खूश असतो. एवढेच मला दिसते. मी त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहतो, हृदयाने समजतो. माझाही नाईलाज होतो.” हे ऐकून आता प्रत्यक्ष महाप्रभूंचे डोळेही अश्रूंनी डबडबले. त्यांनी त्या गृहस्थाला मिठी मारली. म्हणाले, “मला आता तुझ्या चरणांचा स्पर्श करावासा वाटतोय. अरे, तू जिंकलास. व्याकरण जाणून गीता गाणारे प्रकांड पंडित जगात खूप आहेत रे, पण तुझ्यासारखा भाव जागृत होऊन प्रत्यक्ष श्री कृष्णांना भारावून टाकणारे गीता पाठक फारच विरळे आहेत. मी तुला सुधारायला आलो होतो. पण आता लक्षात आले कि तुला सुधारायची इच्छा धरणारा मीच चुकत होतो. शेवटी हे सगळे कशासाठी करायचे असते रे? परमेश्वराच्या प्राप्तिसाठीच ना? तू तर त्या परमेश्वराच्या हृदयाशी कधीच पोहोचला आहेस. तुला व्याकरणाची, योग्य उच्चारांची गरज नाही. स्तोत्रांमध्ये, स्तवनांमध्ये भाव महत्वाचा. बाकी सगळे नगण्य.”



## जाहल्या स्वामीराज वैद्य,
## व्याधी पळे आपणची...

# बोराच्या झाडाला प्रदक्षिणा करून पुत्रप्राप्ति

मुंबई शहरामध्ये त्या काळातील जी.आय.पी. रेल्वेमध्ये कृष्णराव अनंत ऊर्फ भाऊराव सरदेसाई नावाचा एक कारकून होता. त्यांचे मूळचे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर. बऱ्याच वर्षांपूर्वी मुंबईला नोकरीसाठी येऊन ते मुंबईला स्थायिक झाले होते. हरिभाऊ तथा श्री स्वामीसुत यांनी मुंबईत श्री स्वामी समर्थांच्या मठाची स्थापना केल्यानंतर भाऊराव त्या मठामध्ये भजन कीर्तन करण्यास जात असत. एका पुत्राशिवाय त्यांना दुसरी कोठलीच संतति नव्हती. त्यांच्या पत्नी जन्मतःच क्षयरोगी असल्यामुळे शरीराने त्या यथातथाच होत्या आणि त्यांच्या मुलाला पाहून कोणालाही वाटत नसे कि हा ह्या बाईंचाच मुलगा आहे. स्वामीसुतांच्या तोंडून श्री स्वामी समर्थांची किर्ती ऐकून भाऊरावांना वाटले कि आपणही स्वामींच्या दर्शनाला अक्कलकोटला जावे व तसा योग जुळुन येऊन ते स्वामीसुतांबरोबरच स्वामी दर्शनाला गेले. तेथून परत आल्यानंतर काही दिवसांनी ते आपल्या पत्नीला घेऊन

पुन्हा अक्कलकोटला गेले. त्यांच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णाबाई असे होते. आपल्याला आणखी एक पुत्र हवा ह्या इच्छेने त्या दोघांनी स्वामींची एकनिष्ठपणे सेवा केली.

एक दिवस ह्या दोघांनी स्वामींच्या सेवेतील सुंदराबाईंना गळ घातली कि त्यांनी स्वामींना विचारावे कि आम्हाला आणखी एक पुत्र होईल का? त्याप्रमाणे सुंदराबाईंनी स्वामींना विचारले, “अन्नपूर्णाबाई पुत्र व्हावा ह्या इच्छेने आपली सेवा करण्यास आल्या आहेत तर महाराज कृपा करून त्यांना एक पुत्र मिळावा” महाराजांनी उत्तर दिले कि, “त्यांनी बोराच्या झाडाला प्रदक्षिणा कराव्यात. त्यांना एक अग्निसमान तेजस्वी पुत्र होईल.” अन्नपूर्णाबाईंनी स्वामींच्या चरणावर माथा टेकवला व त्या मुंबईस परतल्या. आल्यावर त्यांनी भाऊरावांना विचारले, “बोराच्या झाडाला प्रदक्षिणा घातल्याचे कधी आपण ऐकले नाही. आपण प्रदक्षिणा करायला लागलो तर लोक काय म्हणतील? लोक आपल्याला हसतील कि ही अशी कसली प्रदक्षिणा? तर काय करावे?” भाऊराव म्हणाले, “महाराजांच्या बोलण्याचा अर्थ कोणाला पटकन कळत नाही. तू पिंपळाला प्रदक्षिणा घाल. काम झालेच म्हणून समज.” बालमुकुंद मठाकडे पिंपळ होता. त्याला त्यांनी एक वर्ष प्रदक्षिणा केली. परंतु पुत्र काही झाला नाही, अन्नपूर्णाबाई निराश झाल्या. पण भाऊराव त्यांना समजवायचे. म्हणायचे तिन्ही काळातसुद्धा स्वामींचा आशिर्वाद कधी व्यर्थ नाही व्हायचा.

एक दिवस भाऊराव स्वामीसुतांच्या मठामध्ये गेले होते. त्यांनी श्री सच्चिदानंद स्वामीकुमारांपाशी श्री स्वामी समर्थांनी बोराच्या झाडाला प्रदक्षिणा घालायला सांगितल्याचा उल्लेख केला. त्यांनी हेही सांगितले कि आपल्या पत्नीने अश्वत्थाच्या (पिंपळाच्या) झाडाला एक वर्ष सातत्याने प्रदक्षिणा केली. परंतु पुत्रप्राप्ति झाली नाही. स्वामीकुमारांनी विचार केला आणि उत्तर दिले, “महाराजांच्या आज्ञेचा अर्थच नाही कळला तुम्हाला. श्री स्वामीसुतांना महाराज बोराचे झाड असे कौतुकाने म्हणायचे. श्री स्वामीसुतांच्या मठात येऊन तुमच्या पत्नी सेवा करतील तेव्हा त्यांची मनिषा पूर्ण होईल.” त्यानंतर सातत्याने त्या दांपत्याने मठात जाऊन सेवा सुरू केली आणि काही काळातच भाऊरावांची पत्नी गर्भवती राहिली. पांच महिन्यांनंतर त्यांनी आपल्या पत्नीला तिच्या माहेरी कोंकणात पाठविले. भाऊरावना वारंवार काळजी वाटायची कि पत्नी गर्भवती राहिली खरी पण अश्या अशक्त अवस्थेत तिची प्रसूति सुरळीत कशी होणार? तिने बाळाला जन्म देणे हे मोठे जिकीरीचे आहे हेही त्यांना जाणवले. परंतु स्वामींवर भरंवसा ठेऊन भाऊराव स्वस्थ बसले. नऊ महिने भरत आले आणि येथे भाऊरावना स्वप्न दृष्टांत झाला. स्वप्नात येऊन स्वामींनी भाऊरावना सांगितले कि मी सोनवडयाला स्नानासाठी जातो आहे.” आश्चर्याची गोष्ट म्हणजे अन्नपूर्णाबाईही सोनवडयालाच गेल्या होत्या प्रसूतिसाठी. भाऊरावांच्या मनात धस्स झाले. मुलाबरोबर पत्नीही हातातून जाते कि काय ह्या एका विचाराने त्यांना भेडसावले. परंतु दुसऱ्याच दिवशी त्यांना सोनवडयावरून वार्ता आली कि सकाळच्या प्रहरीच त्यांच्या पत्नीने मुलाला जन्म दिला.

तो मुलगा स्वामींनी म्हटल्याप्रमाणे अग्निसारखा सतेज आणि चैतन्यमय जन्मला. पुत्र जन्मला त्यावेळेला भाऊरावांचे वय पन्नाशीचे होते तर त्यांच्या व्याधिग्रस्त पत्नीचे पस्तीशीचे. क्षयरोगी अन्नपूर्णाबाईंना मूल होणे म्हणजे वठलेल्या झाडाला पालवी फुटण्यासारखेच होते. पूर्ण श्रद्धा ठेवली की स्वामींचा चमत्कार कसा अनुभवायला मिळतो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.




**(संदर्भ: अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराज चरित्र, लेखक: कै गणेश बल्लाळ मुळेकर)**

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक ८ वा

लेखकः श्री प्रांजल जोशी, पुणे



## ध्यानाची शक्ती

ध्यानाची शक्ती आपल्याला सर्व काही देऊ शकते. जर तुम्हाला निसर्गावर प्रभुत्व मिळवायचे असेल, तर ते देखील ध्यानाद्वारे शक्य आहे.

या ध्यानाच्या सामर्थ्यानेच तर आजपावेतो सर्व वैज्ञानिक तथ्ये शोधली गेली आहेत. वैज्ञानिक जेव्हा एखाद्या विषयाचा अभ्यास करतात तेव्हा ते आजूबाजूचे सर्वकाही विसरतात, त्यांना स्वत:चे देखील भान राहत नाही आणि मग अचानक एक महान सत्य, एखादी वीज चमकावी तसे क्षणार्धात सामोरे येते.

काही लोकांना वाटते हे अचानक स्फुरले आहे.

अशी स्फूर्ती येणे, प्रेरणा मिळणे असे काही अचानक घडत नसते. जे काही स्फुरते, उमगते, सुचते, ते अगोदरच तुमच्या चित्तामध्ये असते. त्याला अनुकूल कारण घडले की ते एखादी वीज चमकल्याप्रमाणे सामोरे येते इतकेच !

पूर्वीचे कर्म, केलेले कार्य, घेतलेली मेहनत हेच त्याला कारणीभूत असते. आणि इथेसुध्दा तुम्हाला ध्यानाच्या शक्तीचा प्रत्यय येईल – जे घडतंय त्या मागच्या विचाराची प्रखरता किंवा आवेग केवढा असेल? हे लोक (योगी अथवा वैज्ञानिक) ध्यानाद्वारे मोठे मंथन करतात अन म्हणून मग महान सत्य व शोध जन्माला येतात.

म्हणूनच ध्यान – धारणेचा सराव करणे ही ज्ञानप्राप्तीची श्रेष्ठ वैज्ञानिक पध्दती आहे.

## ध्यान एक विज्ञान आहे

सारे अस्तित्व एकच आहे. अनेक असूच शकत नाही. हे समजणे हेच ज्ञान आहे अन विज्ञान देखील. अज्ञानामुळे ते अस्तित्व बहुविध (अनेकविध) भासते.

पण ज्ञानाने ते एकच आहे हे समजते. या अनेकविध आभासातून, ते एकच असल्याचे जाणणे, हेच विज्ञान.

सारे ब्रम्हांड एकच आहे (विष्णूमयं जगत सर्वम वा सर्वकाही चैतन्यमय आहे) हे ज्या विज्ञानाने दाखवून दिले त्या विज्ञानाला “वेदांत” असे म्हणतात.

ते विज्ञान सांगते की हे सारे ब्रम्हांड एकच आहे (चैतन्यमय आहे).

आपण वेगवेगळ्या गोष्टी पाहतो, ज्याला आपण पाच घटक (वा तत्व) असे म्हणतो. जसे की (पृथ्वी, आप, वायू, तेज, आकाश) किंवा घन, द्रव, वायू, प्रकाश अन अवकाश.

वेदांत पध्दतीमध्ये ध्यान समाविष्ट आहे, ज्यामध्ये प्रत्येक गोष्ट शेवटी एकाच अंतिम सत्यात विलीन होते. ते म्हणजे चैतन्य !

जसे की घन पदार्थ विरघळून द्रव पदार्थ बनतो, द्रव वायूमध्ये बदलते, वायू आकाशात, आकाश मनामध्ये आणि शेवटी मन देखील विरघळून जाते – चैतन्यामध्ये.

म्हणजे सर्वकाही चैतन्यमयच आहे.



तुम्ही जाणताच की ध्यान ही कल्पनाशक्तीद्वारे करावयाची प्रक्रिया आहे. आपण शुध्दीकरणाच्या या सर्व स्तरांमधून (प्रक्रियांमधून) जातो.

ज्यामध्ये एक घटक दुसऱ्यामध्ये विरघळून (मिळून वा विलीन होऊन), पुढल्या आणखी उच्चस्तर घटकात जातो, अन मग तो त्याच्या पुढल्या.

असे करत करत, मग सर्वकाही मनात अन सरतेशेवटी आत्म्यात (चैतन्यात) मिळून जाते (विलीन होते).

हा एक मोठा चैतन्याचा गोळा आहे. जणू काही चिकणमाती. मग मी त्यापासून एक छोटा उंदीर बनवतो अन आणि कोणी त्याच गोळ्याचा एक हत्ती बनवितो.

पण शेवटी दोन्हीही बनले एकाच मातीचे. दोन्हीही विघटीत केले तर तीच चिकणमाती मिळेल. म्हणजे ते दोन्हीही मुळात एकच आहेत.

## पवहारी बाबा – एक आदर्श योगी !

पवहारी बाबांची एक कथा सगळ्यांनाच माहीत आहे. एकदा एक चोर पवहारी बाबांच्या आश्रमात चोरी करण्यासाठी आला. त्याला चोरी करताना बाबांनी पाहीले. पकडले जाण्याच्या भीतीने तो चोर, चोरलेला माल तसाच टाकून पळू लागला. हे पाहून, पवहारी बाबा काही मैल त्याच्या मागे मागे पळत गेले. बाबांनी ते चोरीचे गाठोडे त्याच्यासमोर ठेवले, बाबांच्या डोळ्यात पाणी होते, त्यांनी चोरासमोर हात जोडले, तो चोरी करत असताना आपण मधेच आल्याबद्दल त्या चोराची माफी मागितली आणि त्याला आर्जव करून ते चोरीचे गाठोडे त्याला दिले. ते म्हणाले की अरे हे आता तुझ्या मालकीचे आहे. माझा त्यावरचा अधिकार संपला.

बाबांची अशीच एक कथा, एका अत्यंत खात्रीलायक माणसाकडून आम्हाला समजली. एकदा बाबांना सर्पदंश झाला. विषबाधेमुळे कित्येक तास ते अगदी मेल्यासारखे निपचित पडून होते. ते पुन्हा शुध्दीवर आले, तेव्हा त्यांच्या सहकाऱ्याने झालेल्या प्रकाराबद्दल त्यांना विचारले. यावर “तो नाग तर माझ्या लाडक्या परमेश्वराचा दूत (देवदूत) होता” एवढेच त्यांनी उद्गारीले.

त्यांच्यामधील एक महान वैशिष्टय म्हणजे, अगदी बारीक सारीक, शुल्लक कामदेखील ते तितक्याच आत्मीयतेने अन संपूर्ण लक्ष देऊन करायचे.

जेवढी आत्मीयता अन काळजी रघुनाथजी (रामरायाची) पूजा प्रार्थना करताना, तेवढीच निष्ठा तांब्याचे भांडे साफ सुफ करताना ते बाळगायचे.

त्यांनी एकदा आम्हाला एक गुपित सांगितले होते, “साधन हेच अंतिम साध्य आहे, असे समजावे. म्हणून त्याची देखील तितक्याच आत्मीयतेने काळजी घेतली पाहिजे अन त्यावर तितकेच प्रेम केले पाहीजे.”

पवहारी बाबांचे आचरण या महान सत्याचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे.

स्वामी विवेकानंदानी पवहारी बाबांना एकदा विचारले की साऱ्या विश्वाला मदत करण्यासाठी बाबा त्यांच्या गुहेबाहेर का पडत नाहीत?

यावर बाबा म्हाणाले, “तुला असे वाटते, की फक्त शारीरिक श्रमांनीच तशी मदत करता येईल? शारीरिक हालचालींशिवाय देखील, एक मन (चित्त) इतर मनांना खूप काही मदत करू शकते, असे नाही वाटत तुला?”

क्रमशः



# अष्टावक्र गीता

(भाग २)

**अजित सर**

गेल्या अंकात आपण अष्टावक्राच्या संबंधातील दोन कथा वाचल्या असतील. जनक राजा अष्टावक्राला मानायला लागला कारण त्याच्या लक्षात आले कि हा कोणीतरी अध्यात्माचा अधिकारी व्यक्ती आहे. जनक राजा स्वत: खूप अभ्यासू होता, त्याचा अध्यात्माचा गाढा आणि सखोल अभ्यास होता. त्याने एका ग्रंथात वाचले होते कि आत्मसाक्षात्कार केवळ एकाच क्षणात होतो. त्याच ग्रंथात एक उदाहरण असे होते कि आत्मबोध एवढ्या छोट्या वेळात होतो कि एखादा घोडेस्वार घोड्यावर बसताना एका रिकिबीमध्ये पाय टाकून दुसरा पाय दुसऱ्या रिकिबीत टाकायला जेवढा वेळ लागतो तेवढाच समय आत्मबोधाला पुरतो. हे वाचून जनक राजाला विस्मय वाटला आणि तो मुमुक्षु असल्याने त्याने ठरविले कि ह्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव करावा. त्याने आपल्या राज्यात जाहीर केले कि कोणताही पंडित, गुरू, सिद्ध आपल्याला ह्याचा पुरावा देईल त्याला मी माझा गुरू म्हणून स्वीकारीन आणि त्या माणसाला असा पुरावा देता नाही आला तर त्याला कारावासाची सजा होईल. झाले. बरेच पंडित ज्यांनी तो ग्रंथ वाचला होता त्यांनी राजाला हे पटवून द्यायचा प्रयत्न केला पण कोणीच यशस्वी झाले नाही. सगळ्याच पंडितांना कारावासाची वाट पकडावी लागली. ही वार्ता जेव्हा अष्टावक्रांच्या कानी आली तेव्हा त्यांनी जनक राजाकडे जाऊन हे आव्हान आपण स्वीकारायला तयार आहोत असे सांगितले. त्यासाठी त्याने अट घातली कि राजाने सर्व पंडितांची कारावासातून सुटका करावी. राजाने त्याप्रमाणे अट मंजूर करून सर्वांची सुटका केली.

अष्टावक्राने राजा जनकाला सांगितले कि त्याने अष्टावक्रांबरोबर एकटेच घोडा घेऊन जंगलात यावे तरच ह्या ग्रंथातील त्या वाक्याचा पुरावा आणि प्रत्यक्ष अनुभव ते राजाला देऊ शकतील. एका ठिकाणी पोहोचल्यावर त्यांनी राजाला घोड्यावरील एका रिकिबीत पाय टाकायला सांगितले व विचारले कि ते वाक्य काय आहे? जनकाने ते वाक्य म्हटले त्यावर अष्टावक्रने त्याला विचारले कि त्या वाक्याच्या पुढचे वाक्य काय आहे? राजा म्हणाला, त्यासाठी पात्रता हवी, क्षमता हवी. अष्टावक्रने झटकन प्रश्न विचारला, ही अट तू पूर्ण केली आहेस का? ही पात्रता प्राप्त केल्याशिवाय तू हे वाक्य सिद्ध करण्याचे आव्हान कसे देऊ शकतोस? जनक राजा चमकला. परंतु तो मुमुक्षु होता, त्याला आता ह्या आत्मबोधाची आस लागली होती. कोणतीही किंमत देऊन तो ती अवस्था प्राप्त करण्याला तयार झाला होता.आणि अशा ह्या गुरुकडून ज्ञान प्राप्त होण्याची संधी कोण सोडणार? शास्त्रांचा सखोल अभ्यासक असल्याने त्याला माहित होते कि ही अवस्था प्राप्त करायला अहंकारातून मुक्ती हवी, पूर्ण समर्पण हवे, शरीर आणि मनाच्या बंधनांपासून मुक्त व्हायला हवे, शास्त्र आणि ज्ञान यांच्या मर्यादांतून मुक्ती हवी, सर्व बाह्य उपाधिंपासून मोकळे व्हायला पाहीजे. हीच त्या साधकाची पात्रता आहे. हाच तो क्षण आहे कि अहंकाराचे निर्दालन करून आत्म्याच्या कुशीत शिरण्याचा. हे सगळे एका क्षणात होऊन जाईल. वेळ लागतो तो फक्त ह्या सगळ्या गोष्टींविषयी आपली धारणा, आपला दृष्टीकोन बदलण्याचा. आणि हा दृष्टीकोन बदलायला एक क्षण पुरे. त्यासाठी कोठल्याही प्रक्रियेची गरज नाही, कोठल्याही साधनेची गरज नाही, हे विचार त्या क्षणाला जनक राजाच्या मनामध्ये कल्लोळ करू लागले आणि त्या क्षणी त्याने अष्टावक्रच्या चरणी लोळण घेऊन समर्पण केले व म्हणाला,

हे मुनि, हे शरीर, मन, बुद्धी, अहंकार सगळे मी तुम्हाला अर्पण करतो. तुम्ही त्यांचे जे करायचे ते करा. समर्पण भाव प्रगट झाला आणि राजाचा अहंकार नष्ट झाला, जनक शून्य झाला, स्थूलाचा सारा संबंधच सुटुन गेला. सगळे पाश आपोआप गळून पडले. अष्टावक्रने त्या क्षणाला आपले सगळे भांडार रिक्त केले. जनक राजाला भरून टाकले आत्मज्ञानाने, आत्मबोधाने. जो संसाराच्या, व्यवहाराच्या ओझ्यातून मुक्त झाला तोच आत्मज्ञानाने भरला जातो. नाहीतर सर्व भरून सुद्धा तो रिकामाच राहतो. दुसऱ्या रिकिबीत पाय टाकायच्या आधीच जनक राजाला आत्मसाक्षात्कार झाला. जनक राजा समाधि अवस्थेत पोहोचला. दुसरा पाय दुसऱ्या रिकिबीत टाकायचे भानच त्याला राहीले नाही.असे एक नाही, दोन नाही तब्बल तीन दिवस गेले. राज्यातला राजाच गायब झाल्याने राज्यात अनावस्था ओढवली. सगळे मंत्री, दरबारी राजाच्या शोधात जंगलात आले आणि पाहतो तो काय? राजा एक पाय रिकिबीत अडकवलेला आणि दुसरा हवेत अशा अवस्थेत घोड्यावर बसलेला आणि बाजूला बसलेले अष्टावक्र मुनि. दोघेही शांत

अवस्थेत. त्यातील एका मंत्राने जनकाला सांगितले कि राज्याची अवस्था गेले तीन दिवस बिकट आहे तरी आपण त्वरित परत चलावे. राजाने म्हटले, आता कोण परतणार? माझे तर सगळे अस्तित्वच मी माझ्या गुरूला समर्पित केले आहे. आता त्यांचा आदेश होईल तसेच वागणार. अष्टावक्र समजून चुकले होते कि जनकाला आता आत्मबोध झाला आहे, एका क्षणात त्याचे सगळे पाश तुटुन पडले आहेत. म्हणून मग त्याला त्यांनी राज्यात जाऊन राज्य चालवण्याचा आदेश दिला.

ही घटना विलक्षण आहे, रहस्यमय आहे आणि रोचक आहे. एका क्षणात सगळे पाश तुटुन पडून मुक्तीची अंतिम अवस्था प्राप्त करणे खरेच एक दिव्य अनुभव आहे. आत्मबोध म्हणजे काही प्रक्रिया नाही. पण एक घटना आहे जी, जो कोणी या पात्रतेला प्राप्त झाला आहे त्याला, एका क्षणात साधू शकते. कोठेही साधू शकते. ज्ञानप्राप्तिसाठी बऱ्याच प्रक्रिया आहेत, योगासाठी क्रिया आहेत, तंत्रामध्ये समर्पण आहे तर सांख्यामध्ये केवळ आत्मबोध आहे. सांख्य मानते कि आत्मा काही शोधण्याची वस्तू नाही. तो कोठेच हरवला नाही. त्याला मिळवायचे नाही आहे, कारण तो तर आपल्या बरोबरच सदैव आहे. त्याची फक्त जाणिव करून घ्यायची आहे. बुद्धांनी साडेचार–पांच वर्षे साधनेद्वारा आत्मबोध करायचा प्रयत्न केला. परंतु ज्या क्षणी त्याने सर्व प्रयत्न सोडण्याचा निर्णय घेतला त्याच क्षणात तो आत्मबोधी झाला. (आधुनिक विज्ञानात सुद्धा मादाम क्युरींना हा अनुभव झाला आहे हे महत्वाचे). संपूर्ण अष्टावक्र गीता हे ह्या सांख्याचे तत्वज्ञान आहे. ते आपण ह्या मालिकेत पाहणार आहोत.

# आश्रम वार्ता

## १. नांदेड जिल्ह्यातील सगरोळी गावात अग्निहोत्र शिबीराचे आयोजन

नुकतेच ३ व ४ ऑक्टोबर रोजी, संस्कृती संवर्धन मंडळ व सत्वम भारत मुंबई यांनी संयुक्तपणे अग्निहोत्र शिबीर नांदेड येथील सगरोळी येथे संपन्न केले. डॉ. अमोल अहिवले (MBBS), मनोज पांचाल (सामाजिक कार्यकर्ता) व रेकि साधक मंदार कोपरे ह्यांनी हा कार्यक्रम साकार केला. सगरोळी येथील माध्यमिक शाळा, कृषी विज्ञान केंद्र, सैनिकी शाळा तसेच देऊळ (ग्रामस्थांसाठी) अशा विविध ठीकाणी या शिबिराचे आयोजन केले गेले होते. जवळ जवळ २०० लोकांनी ह्या कार्यक्रमाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे त्यातील ५० जणांनी अग्निहोत्र करण्यास सुरुवात केली. ह्या कार्यक्रमात डॉ. उर्लीक बर्क, ब्रुस जॉनसन, राकेश कुमार, राकेश पंड्या, अनिल जामदार ह्यांनी ही झुम मिटींगद्वारे अग्निहोत्रासंबंधी आपापले अनुभव कथन केले.





## २. नवरात्री निमित्त DSPPL चे ऑनलाईन योगा क्लासेस

नवरात्रीचे अवचित्त साधून चांगले स्वास्थ आणि अध्यात्मिक अनुभुतीसाठी, DSPPL ने महीलांसाठी योगा शिबीराचे आयोजन केले होते. योग निकेतन, बडोदा येतील अधिकृत शिक्षक अजीता सोमण, ज्या गुजरात जिल्ह्याच्या योग शिक्षिका देखील आहेत त्यांनी हे शिबीर घेतले. यात प्रामुख्याने सुक्ष्म क्रीया, उत्तानपादासन, कटी उत्तानासन, पवनमुक्तासन, शलभासन, मलासन, मार्जरासन, वक्रासन, अनुलोम-विलोम आणि शवासन अशा आसनांचा समावेश होता. हा कार्यक्रमात मुख्यत: तणावमुक्ती, वेदनामुक्ती, चयापचय प्रक्रियेत सुधार तसेच स्त्रीरोग, जसे मासिक पाळीची नियमितता, अंत:स्त्रावी ग्रंथीचे कार्य, शारीरीक लवचिकता, वजन वाढीवर नियंत्रण (ऋतुसमाप्तिसाठी नियोजन) इत्यादी गोष्टींवर भर दिला गेला. साधक महीलांनी ह्या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.





## ३. ग्राम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी 'देवरुख साधक पेठ' ची स्थापना

DSP
Devrukh Sadhak Peth

सध्याच्या कोवीड महामारीच्या काळात लोकांची केवळ शारीरिक स्वस्थताच नव्हे तर आर्थिक परिस्थितीही खालावली आहे. शहरातील तसेच गावातील लघुउद्योगांवरही ह्याचा परिणाम दिसून येत आहे. आपले देवरुख गावही ह्याला अपवाद नाही. आपल्या देवरुख साधकांनाही दैनंदीन अर्थाजन करण्यात अडचणी येत आहेत. त्यांना त्यांच्या गृह उद्योगात प्रोत्साहन देण्यासाठी, गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली, श्री आल्हाद पुरोहीत व श्री निलेश जोशी ह्यांनी 'देवरुख पेठ' ची स्थापना केली आहे. देवरुख पेठ मध्ये दैनंदिन जीवनात लागणाऱ्या सर्व गोष्टी तसेच देवरुख मधील विशेष गोष्टीही, आपल्या भारतातील सर्व साधकांसाठी उपलब्ध आहेत.

दिवाळीच्या निमित्ताने देवरुख साधक पेठने 'दिवाळी बास्केट' ही योजना सुरु केली आहे, ज्यात दिवाळी फराळ, रांगोळी मांडणी, रांगोळीचे रंग, आणि पूजेसाठी आवश्यक सामग्री ह्याचा समावेश आहे.

गुरुजींनी ह्या बास्केटची मागणी करण्याचे आवाहन सर्व साधकांना केले आहे. तुमच्या सहाय्यामुळे देवरुख मधील साधकांच्या लघुउद्योगांना हातभार लागेल. चला एकत्रित होऊन चांगले विश्व निर्माण करू.




You can place your order at:

[http://devrukhsadhakpeth.com/](http://devrukhsadhakpeth.com/)

(Additional items can be ordered separately)

# आश्रम स्पंदन..

गेल्या वर्षी आपण साधकांसाठी काढलेली स्वामी दिनदर्शिका फारच गाजली आणि अजूनही गाजत आहे. त्यातील स्वामींच्या मुखातील उदगार बहुतांशी हिंदीत रुपांतरीत होते. बऱ्याच साधकांना त्या उदगारांमागील गूढ किंवा त्यामागची परिस्थिति किंवा त्यामागची घटना माहीत नसल्याने ह्या उदगारांबद्दल खूपच कुतुहल होते. त्यामिमित्त आता आपण ही वाक्ये ह्यापुढे आश्रम स्पंदन ह्या सदरात सादर करी आहोत. त्यातील हा पहिला भाग.




## शेत पिकवावे आणि खावे..

आपल्या भक्तांनी आळशी नसावे असा स्वामींचा अट्टाहास होता, परिश्रम हे साधनेतील एक मोठे साधन आहे असे स्वामी वारंवार म्हणायचे. "शेत पिकवावे आणि मग खावे." हा स्वामींचा मंत्र तर सर्वश्रुतच आहे. भगवान श्री कृष्णाने श्रीमद् भगवतगीतेत म्हटलेच आहे कि "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषुकदाचन।" देहाचा अधिकार फक्त कर्म करण्याचाच आहे, त्याला फळाचा अधिकार नाही. "कर्म" ही प्रक्रिया आहे तर फळ हे त्याचे फलित. कर्म हे बीजगणितातील समीकरणाची डावी बाजू, तर फळ ही उजवी बाजू. कर्म हे जर शरीर तर फळ हे त्याचे प्रतिबिंब. आधुनिक विज्ञानाचा ज्याने पाया घातला तो न्युटन सुद्धा आपल्या पहिल्या सिद्धांतात म्हणतो कि, "प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते." हे सारे विश्वच कार्यकारणभावावर (cause and effect relationship) चालले आहे. एखादी क्रिया सुद्धा कुठल्यातरी दुसऱ्या कर्माची प्रतिक्रिया असू शकते. त्यामुळे जीवन हे मुळात क्रिया-प्रतिक्रियांचा लपंडाव, किंबहुना प्रतिक्रियांचाच खेळ आहे. प्रतिक्रिया म्हणजे प्रतिबिंब, आणि प्रतिबिंबे म्हणजेच माया. म्हणूनच कदाचित ह्या जीवनालाच माया असे सिद्धपुरुषांनी संबोधिले आहे.

म्हणूनच श्री स्वामी समर्थ म्हणायचे "शेत पिकवावे आणि मग खावे." शेतीसाठी जमीन नांगरणे, जाळणे या सगळ्या प्रक्रिया करुन त्यात बी-बीयाणे घातले कि शेतकऱ्यांची कामे झाली. मग त्या शेतात पाऊस पाडून त्या बीजांना अंकुर फुटवणे हे काम देवाचे. शेतकरी जमीन तयार करतो देव त्यात धान्य पिकवतो. शेतकऱ्याने जर जमीन कसलीच नाही तर शेती कशी होणार? पीक कसे उगवणार? उगवले तर फक्त गवत. गहू आणि तांदूळ असेच उगवलेले आपण कधी पाहिलेत का? सद्गुण वाढवण्यासाठी मेहनत करणे आवश्यक आहे. मनाची, अंतःकरणाची मशागत करायला हवी. बुद्धी कसायला हवी मग तिला साधनेचे, ध्यान-धारणेचे खत मिळायला हवे. तरच त्या सद्गुणांचे अंकुर फुटतील. सद्गुणांचे भरघोस पीक काळाच्या वाऱ्यावर अस्तित्वाच्या चिदाकाशामध्ये डोलायला लागेल. परंतु ही काळजी घ्यायला हवी कि त्या पिकांबरोबर कॉंग्रेजी गवत फोफावणार नाही. मनाची मशागत करताना मनाची भूमी तापवावी लागेल. तपन करावे लागेल, तपस्या करावी लागेल, जेणे करून दुर्गुणांचे गवत फोफावणार नाही. शेती करण्याचा अर्थच मुळी साधना करणे, सद्कर्म करणे. मग खाण्यासाठी पीक तयार होईल, श्री स्वामी समर्थांची कृपा लाभेल. मोक्षाचा मार्ग खुला होईल.

बऱ्याच साधकांचा, स्वामी भक्तांचा असाही समज असतो कि आपण काहीच परिश्रम न करता साऱ्या जीवनाचा भार स्वामींवर सोपवावा. परंतु हे समर्पण अथवा अद्वैत केवळ जबाबदारी टाळण्यासाठी आहे का? ह्या प्रश्नांचे उत्तर प्रत्येकाने स्वतःकडून मिळवणे आवश्यक आहे. स्वतःचे परिश्रम, कर्म स्वतःच्या पूर्ण साक्षीभावाने करून त्या कर्माचे फलित तयार करण्यासाठी स्वामींना जागा (space) तयार करणे हे प्रत्येकाचे उद्दीष्ट हवे. जसे एखदा शेतकरी जमीन कसून पावसासाठी तयार राहतो, द्वैताचे जीवन जगताना जमीन खोदून चारहि बाजूनी बांधून त्यात पाऊस पडण्याची प्रतीक्षा करणे हेच खरे. तरच तलाव तयार होईल. एकदा का साधक साधूचे, सिद्धांचे अद्वैतातील जीवन जगायला तयार झाला की मग मात्र हे सारे करायची गरज उरणार नाही. द्वैतात राहून मात्र अद्वैताची घटना पाळणे जरा त्रासदायक होईल.



# स्वामींचे नवरात्रीतले तेजस्वी रुप

देवरुख, ओझरे मठ